सकाळ

# लोकशाही सक्षमीकरणात नवयुवकांनी सहभाग घ्यावा

## डॉ. खिलारी; कर्मवीर हिरे महाविद्यालयात कार्यक्रम

**गारगोटी, ता. ३ :** लोकशाही सक्षमीकरण कार्यक्रमात नवयुवकांनी सक्रिय सहभाग घ्यावा. मतदार नोंदणीकामी सर्वांना प्रोत्साहित करावे, असे आवाहन प्रांताधिकारी डॉ. संपत खिलारी यांनी केले. येथील कर्मवीर हिरे कनिष्ठ महाविद्यालयात महसूल विभागातर्फे आयोजित निवडणूक साक्षरता मंच कार्यक्रमात बोलत होते.

प्राचार्य डॉ. जी. एस. म्हांगोरे अध्यक्षस्थानी होते. डॉ. खिलारी म्हणाले, महाविद्यालयांनी युवकांच्या संकल्पनांना महत्व द्यावे. विद्यार्थ्यांसाठी लोकशाहीविषयक विविध उपक्रम राबवावेत. यातून लोकशाही बळकटीकरणाला चालना मिळेल. प्रा. अरविंद चौगले यांनी प्रास्ताविक केले.

प्राचार्य डॉ. जी. एस. म्हांगोरे यांनी मनोगत व्यक्त केले. नायब तहसीलदार व्ही. एन. बुट्टे, उपप्राचार्य प्री. ए. देसाई, डॉ. संजय देसाई, प्रा. बी. बी. डवंग, प्रा. एन. डी. पाटील, प्रा. डी. ए. कांबळे, प्रा. एस. जे. जीतकर, प्रा. डी. पी. गुरव आदी उपस्थित होते.



**गारगोटी : कर्मवीर हिरे कनिष्ठ महाविद्यालयातील कार्यक्रमात बोलताना प्रांताधिकारी डॉ. संपत खिलारी. शेजारी प्राचार्य डॉ. जी. एस. म्हांगोरे, प्रा. एस. बी. देसाई, नायब तहसीलदार व्ही. एन. बुट्टे, प्रा. पी. ए. देसाई.**